2018-19

## इतिहास विभाग

सत्र २०१८-१९ या सत्रात इतिहास विभागाच्या वतीने जुन ते जुलै २०१८ पर्यंत अँडमिशन करण्याकरिता प्रवेश समितीत काम करण्यात आले.

दि. १३ ऑगस्ट २०१८ रोजी महाविद्यालयात बी.ए.भाग-१ (इतिहास) विषयात प्रवेशीत विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले होते.

दि. ५ सप्टेंबर २०१८ रोजी शिक्षक दिनानिमित्त डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन याच्या जीवनापटावर आधारीत 'वक्तृत्व स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

दि. १० ऑक्टोंबर २०१८ रोजी इतिहास विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० जयंती उत्सवानिमित्त एकदिवसीय सेमीनार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दि. १५ डिसेंबर २०१८ रोजी महाविद्यालयात आयोजित विद्यापीठस्तरीय अविष्कार स्पर्धेत विभागातील दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

दि. २७ डिसेंबर २०१८ रोजी इतिहास विभागाच्यावतीने अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. चिखली जवळच असलेल्या सातगाव भुसारी येथील प्राचीन हेमाडपंथी मंदिराला भेट देण्यात आली.

दि. १९ फेब्रुवारी २०१८ रोजी इतिहास विभागाच्यावतीने शिवजयंती निमित्त अभिवादनपर कार्यक्रम व रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

दि. ८ मार्च २०१९ रोजी महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय महिला कार्यशाळेत इतिहास विभागाच्या नितीन दिपेकर (बी.ए.भाग-१) याने पीपीटी द्वारे भारताच्या इतिहासातील ऐतहासिक स्त्रियांच्या कामगिरीचे अध्ययन विषयावर प्रकाश टाकला. त्याच्या उत्कृष्ट सादरीकरणाने त्याला तृतीय क्रमांकाने सन्मानित करण्यात आले. याशिवाय इतिहास विभागाच्यावतीने विविध अभ्यासपुरक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

**डॉ. विष्णू रा. पडवाल**

***

## राज्यशास्त्र विभाग

विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मुल्यांची रूजवणूक करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र बँक चिखली व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 'भ्रष्टाचार विरोधी जनजागृती अभियान' अंतर्गत समुह चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. भ्रष्टाचाराची कारणे, परिणाम व त्यावरील उपाय यासदंर्भात ६० विद्यार्थ्यांच्या पाच गटांनी चर्चेत भाग घेतला. महाराष्ट्र बँकेचे व्यवस्थापक रोहन शर्मा, दमन चौधरी, राजेश साळवे, प्रा. योगेश वायाळ, प्रा. ठेंग, प्रा. वाघोदे, यांनी आयोजनात सहकार्य केले. प्रास्ताविक प्रा. जे. जे. जाधव सुत्रसंचालन प्रा. डॉ. पोच्छी तर प्रा. डॉ. कलाखे यांनी आभार मानले.

तसेच विभागाच्या वतीने २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले. विभाग प्रमुख प्रा. डॉ. जे. जे. जाधव, प्रा. कदम, प्रा. साबळे, प्रा. पडघान, यांनी संविधानाची निर्मिती, उद्देश व महत्व यासंदर्भात मार्गदर्शन तर प्रास्ताविक प्रा. डी. आर. उन्हाळे यांनी प्रास्ताविक केले.

तसेच १० डिसेंबर रोजी जागतिक मानवि हक्क दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रा. जे.जे. जाधव, प्रा. डि. आर. उन्हाळे, प्रा. डॉ. व्ही. आर. पडवाल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याशिवाय दि. ९ डिसेंबर २०१८ रोजी श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती व युवक बिरादरी (भारत) यांच्या संयुक्त विद्यमाने 'युवा भुषण स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. यात १११ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. ॲपटीट्युड टेस्ट, समुह चर्चा, मुलाखत, शारीरिक क्षमता, स्वयंम मुल्यमापन अशा विविध चाचण्या घेऊन दत्तात्रय गाढवे, आदेश नवघरे, कु. सुवर्णा हिवाळे या तीन विद्यार्थ्यांची संस्थास्तरावरील स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. संस्थेच्या २४ महाविद्यालयांच्या स्पर्धकातून कु. सुवर्णा हिवाळे (एम.एम.राज्यशास्त्र) यांना तिसरा क्रमांक प्राप्त झाला. ती मुंबई येथील राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत सहभागी झाली. शिक्षण महर्षि पंजाबराव देशमुख यांच्या जयंती निमित्त अमरावती येथील कार्यक्रमात केंद्रीयमंत्री मा. नितीन गडकरी

यांच्या हस्ते रोख ५००० रूपये व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेचे आयोजन प्राचार्य डॉ. ए.एम. गारोडे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. समन्वयक प्रा. जे. जे. जाधव, सह समन्वयक प्रा. डॉ. पोच्छी, तर प्रा. बोबडे, डॉ. जुक्कलकर, प्रा. उन्हाळे, प्रा. कोकोड, प्रा. मेंढे, प्रा. डॉ. कदम यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.

दि. २ फेब्रुवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलनातील सांस्कृतिक कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थी व कर्मचारी यांच्या प्रचंड उपस्थितीत मतदानाचे महत्व सांगुन प्रा. जे. जे. जाधव, प्रा. डॉ. पडवाल यांनी मतदानाची सामुहिक शपथ दिली. यावेळी प्राचार्य डॉ. गारोडे, सगाबाअवि चे व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. निलेशराव गावंडे, बुलडाणा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुधिर चेके, सकाळ समुहाचे संजय खेडेकर व चिखली न.प. चे सन्माननीय नगर सेवक उपस्थित होते.

या शिवाय नोव्हेंबर २०१८ रोजी झालेल्या 'आविष्कार स्पर्धेत' विशाल मोहीते व सागर राऊत यांनी भाग घेतला तसेच २९ सप्टेंबर २०१८ रोजी अमरावती येथील तर ११ सप्टेंबरच्या खामगाव येथील राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत विशाल मोहीते, शुभांगी पवार यांनी भाग घेतला होता. त्याचप्रमाणे धोंडू सुलताने, मिलिंद पाटोळे यांन मेहकर येथील जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धेत सहभाग घेतला.

**प्रा. डॉ. जे.जे. जाधव**

***



## वाणिज्य विभाग

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये जून महिन्यात महाविद्यालय सुरू झाले, यादरम्यान प्रवेश प्रक्रिया सुद्धा सुरू झालेली होती. वाणिज्य विभागात पदवी आणि पदव्युत्तर विभागात जवळपास ३०० विद्यार्थी प्रवेशित झाले. दि. २ जुलै २०१८ पासून नियमित वेळापत्रक लावण्यात आले व तासिका सुरु करण्यात आल्या. इंग्रजी व मराठी माध्यमांच्या तासिकांची विभागणी नियमित शिक्षिक व घड्याळी तासिकावरील शिक्षकामध्ये करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांना गणवेश व ओळखपत्रं आवश्यक असल्यामुळे त्यासाठी दोन आठवड्यामध्ये तयार करण्यास सांगितले. पहिल्या आठवड्यात वाणिज्य विभागातील सर्व विषयांची माहिती त्यांना देण्यात आली व ज्यांना उद्‌बोधन करण्यात आले.

वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमाचे ज्ञान आवश्यक आहे त्यादृष्टीने त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी एक कार्यशाळा दि. १६ जुलै २०१८ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय शेगाव येथील एम.बी.ए. विभागाचे विभाग प्रमुख डॉ. ए.के.झा. आणि प्रा.दंडे हे लाभले होते. दि. १७/९/२०१८ बॅंकिंग क्षेत्रात नोकरीच्या विविध संधी कश्या उपलब्ध होतील त्याची तयारी कशी करावी यासंबंधी बोर्डेज क्लासेस औरंगाबादचे संचालक प्रा. बोर्डे सरांनी मार्गदर्शन केले. जवळपास १५० विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला.

आजच्या युगात नोकरी मिळविणे हे एक मोठे दिव्य झालेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्यभावना निर्माण होत चाललेली आहे. त्यांना सहजगत्या नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून महिंद्रा फायनान्स कंपनीच्या आणि महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने नोकर भरती शिबीर घेण्यात आले. ज्याद्वारे बी.कॉम. आणि एम.कॉम. फायनलच्या एकूण ३५ विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी निवडण्यात आले. डिसेंबर महिन्यामध्ये सेमिस्टर अभ्यासक्रमाच्या परिक्षा सुरू झाल्या व त्यानंतर दुसरे सत्र सुरू होऊन त्यांचे अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे दृष्टीने तयारी करण्यात आली.

**डॉ. के. एन. शेवाळे**

***

# य.च.म.मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र

भारतात इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ हे असे मुक्तविद्यापीठ आहे की जे दुरस्थ व मुक्त शिक्षणक्रम राबवत आले आहे. या विद्यापीठात सध्या इंग्रजी व हिंदी या दोनच माध्यमातून शिक्षण घेण्याची सोय आहे. शिवाय या विद्यापीठाची अभ्यासकेंद्रे महाराष्ट्रात तुरळक आहेत. भाषेचा अडसर व फार दूर अंतर असल्यामुळे तेथे जाऊन शिक्षण घेणे अवघड व दुरापास्त आहे.

ज्या व्यक्ती काही अडचणीमुळे शिक्षण प्रवाहात येऊ शकल्या नाहीत, अनेक मुलींचे बारावी झाल्यानंतर विवाह होतात, त्यामुळे त्यांची शिकण्याची इच्छा असूनही शिकता येत नाही, बरेच युवक आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातले असल्यामुळे नियमित शिक्षण सोडून मोलमजुरी करून कुटुंबाला आर्थिक हातभार लावतात. शिवाय जे युवक अर्धवट शिक्षण सोडून शासकीय, निमशासकीय अथवा कंपनीमध्ये नोकरी करतात. अशा अनेक व्यक्तींची शिकण्याची इच्छा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने पूर्ण केली आहे. यशवंतराव चव्हाण यांनी मात्र महाराष्ट्राची मातृभाषा मराठी असल्यामुळे शिक्षणाचे माध्यम मराठी असावे असा विचार मांडला आणि त्याची अंमलबजावणी देखील केली.

''ज्ञानगंगा घरोघरी'' आणि ''बहुजन हिताय बहुजन सुखाय'' या दोन ध्येयांने प्रेरित होऊन यशवंतराव चव्हाण यांनी नाशिक येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना एक जुलै १९८९ रोजी केली. मातृभाषा हीच ज्ञानभाषा असावी, परीक्षेचे माध्यम देखील मराठी असावे आणि ते सहज आणि जवळ उपलब्ध करून द्यावे हा विचार यशवंतराव चव्हाण यांनी मांडला. त्यानुसार अनेक शहरी व ग्रामीण महाविद्यालयात मुक्त विद्यापीठाची अभ्यासकेंद्रे स्थापन करण्यात आली.

किमान सातवी उत्तीर्ण असलेले, दहावीत किंवा बारावीत गणित व इंग्रजी येत नाही म्हणून वारंवार नापास झालेले तथा कायमचे शिक्षण सोडून घरी बसलेले विद्यार्थी पदवी शिक्षण घ्यावयाची इच्छा असूनही पारंपारिक पद्धतीने शिक्षण घेऊ शकत नव्हते. अशासाठी या विद्यापीठाने पूर्वतयारी शिक्षणक्रम तयार केला. शासनाची व विश्वविद्यालयाची अधिकृत मान्यता घेतली आणि हा पूर्वतयारी शिक्षणक्रम राबवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणक्रमाच्या प्रथमवर्षाला सरळ प्रवेश घेता येतो. या तरतुदीमुळे मुले अनेक विद्यार्थी/विद्यार्थीनी सर्टिफिकेट कोर्स, डिप्लोमा कोर्स, पदवी व पदव्युत्तर होऊन आज रोजी स्वतःचा छोटामोठा व्यवसाय करून उदरनिर्वाह करीत आहे. बरेच विद्यार्थी स्पर्धा परीक्षा देऊन राजपत्रित अधिकारी होऊन नोकरीवर लागलेले आहेत. ही सर्व मुक्त विद्यापीठाची देणगी आहे असे ते समजतात.

विशेष बाब म्हणजे या विद्यापीठाचे अध्ययन साहित्य म्हणजेच पुस्तके ही दर्जेदार असून ती विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध करण्यासाठी व विद्यार्थ्यांवर संस्कार करण्यासाठी परिपूर्ण आहे. शिवाय ही पुस्तके एम.पी.एस.सी. व यू.पी.एस.सी. या स्पर्धा परीक्षेसाठी अतिउत्तम असून ती संग्रही ठेवण्यासारखे आहे. पारंपारिक विद्यापीठातील आजची शिक्षण पद्धती परीक्षाकेंद्री आहे तर मुक्त विद्यापीठ हे ज्ञान संपादनावर जास्त भर देते. विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त वाचन करावे आणि परीक्षेत कमीतकमी लिहावे हा विद्यापीठाचा मूळ उद्देश आहे.

आज सर्वात अधिक निकड जर कशाची असेल तर ती देशातील प्रत्येक व्यक्तीच्या वृत्तीत बदल घडवून आणण्यासंबंधीची आहे. जोपर्यंत आपण व्यक्तींच्या दृष्टीकोनात व प्रवृत्तीत क्रांतीकारक बदल घडवून आणीत नाही तोपर्यंत आपला देश, आपले राज्य जुन्या चाकोरीच्या बाहेर पडणार नाही हे महान कार्य फक्त शिक्षणच करू शकते. एवढी ताकत शिक्षणात आहे. वाचनात आहे आणि म्हणून संपूर्ण राज्य साक्षर झाले पाहिजे, नव्हे देश साक्षर झाला पाहिजे. शंभर टक्के व्यक्ती साक्षर करण्याचे काम केवळ पारंपारिक शाळा-महाविद्यालये पूर्ण करू शकत नाही, तर या कामी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिकने ''ज्ञानगंगा घरोघरी'' पोहचून शिक्षण देण्याचे मोलाचे काम केले आहे हे कदापिही विसरून चालणार नाही. राज्य साक्षर करण्यात मुक्त विद्यापीठाने खारीचा वाटा उचलला आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये असे मला वाटते.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक चे शहरी ते ग्रामीण स्तरापर्यंत अनेक अभ्यास केंद्रांचे जाळे पसरलेले आहे. जे विद्यार्थी वंचित दुर्लक्षित आणि शिक्षण प्रवाहाच्या बाहेर आहेत अशांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य या विद्यापीठाने केले आहे हे फार मोठे आव्हान विद्यापीठाने स्वीकारले आहे.

श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय चिखली या महाविद्यालयात दिनांक २३ जुलै २०१२ रोजी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्राची रीतसर स्थापना झाली. आज आठ वर्षे या अभ्यासकेंद्रास झाली असून सध्या येथे पूर्वतयारी, बी.ए.एम.ए.(इंग्रजी) व एम.एस्सी. (गणित) हे शिक्षणक्रम राबविले जात आहे. आज रोजी या अभ्यासकेंद्रावर एकूण ९७३ विद्यार्थी दूरस्थ पद्धतीने शिक्षण घेत आहे. या ठिकाणी केंद्रप्रमुख म्हणून डॉ. ए.एम. गारोडे, केंद्रसंयोजक म्हणून प्रा. डी. एम. कानडजे आणि केंद्र शिपाई म्हणून श्री बबन पवार हे प्रशासकीय कर्मचारी सध्या कार्यरत आहे.

**प्रा. डी. एम. कानडजे**
**केंद्रसंयोजक**

***

## वार्षिक स्नेहसंमेलन/शिक्षण महर्षि डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जयंती उत्सव-२०१९

मा. सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था यांचे निर्देशानुसार संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षि कृषिरत्न डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचा १२० वा जयंती उत्सव २५ ते २७ डिसेंबर २०१८ या कालावधीत अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. दिनांक २५ डिसेंबर रोजी ध्वजारोहणाचा कार्यक्रम महाविद्यालयाच्या दर्शनी भागात प्राचार्य डॉ. ए.एम. गारोडे यांच्या हस्ते, व महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत पार पडला. त्याचप्रमाणे महाविद्यालयाच्या इमारतीवर रोशनाई करण्यात आली.

दिनांक २६ डिसेंबर रोजी ''शिक्षण महर्षि डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे जिवन व कार्य' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यात विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण विचार मांडले. त्याचप्रमाणे प्रा. डॉ. गणेश माल्टे, प्रा. पी.जी. सवडतकर, प्रा. डॉ. जे. जे. जाधव यांनी अभ्यासपुर्ण व्याख्यान दिले. यावेळी प्राचार्य डॉ. ए.एम. गारोडे, संस्थेचे स्विकृत कार्यकारणी सदस्य प्राचार्य डॉ.पी. एस. वायाळ, महाविद्यालय विकास समिती तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. निलेशराव गावंडे, आजिवन सदस्य विष्णू पाटील, मधुकरराव पाटील, यांनीही उपस्थित राहुन मार्गदर्शन केले.

दि. २७ डिसेंबर रोजी महाविद्यालयाच्या नेतृत्वात शहराच्या प्रमुख मार्गावरून विविध देखाव्यासह विद्यार्थी व कर्मचारी यांची भव्य प्रभात फेरी काढण्यात आली. यात लेझीम पथक, चित्ररथ, एन.एस.एस. व एन.सी.सी. चे पथकही सहभागी झाले होते.

वार्षिक स्नेहसंमेलन :- विद्यापीठ हिवाळी परिक्षा सुरू असल्यामुळे वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम दिनांक ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत आयोजित करण्यात आला. या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे स्विकृत कार्यकारणी सदस्य प्राचार्य डॉ.पी.एस. वायाळ यांच्या हस्ते तर शाळा समिती सदस्य श्री मधुकर पाटील, संतोषराव पाटील, विष्णुपंत पाटील, यांच्या प्रमुख उपस्थीत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए.एम. गारोडे हे होते.

विद्यार्थ्यांना आनंद व व्यवहारीक जीवनाचा अनुभव मिळावा या दृष्टीने 'आनंद मेळावा' आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन शाळा समिती सदस्य श्री भालचंद्र पवार, आजिव सदस्य अशोकराव पाटील यांच्या हस्ते झाले.

**संयोजक- प्रा. डॉ. जे. जे. जाधव**
**केंद्रसंयोजक**

***